महाराष्ट्र विधानपरिषद

पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२१

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

ठाणे जिल्हा शल्यचिकित्सालयाचे सुपर स्पेशालिटी रुग्णालय करण्याबाबत

(१) १४३९ (१८-०३-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा शल्यचिकित्सालयाचे सुपर स्पेशालिटी रुग्णालय करण्यासाठी शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्या इमारतीचा आराखडा व अंदाजपत्रक तयार केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ५७४ खाटांच्या अद्ययावत रुग्णालयासाठी शासनाने किती निधी मंजूर केला आहे, तसेच बांधकाम करण्यात येणाऱ्या रुग्णालयाच्या स्थलांतराचे काम कोणत्या स्थितीत आहे व नवीन रुग्णालयाचे काम केव्हापर्यंत पूर्ण होणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाणे जिल्हा शल्यचिकित्सालयाचे सुपर स्पेशालिटी रुग्णालय करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (१५-०२-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३), (४) व (५) ५७४ खाटांच्या श्रेणीवर्धीत सुपर स्पेशालिटीसह रुग्णालयाच्या बांधकामासाठी अंदाज आराखड्यांना रु ३१४.११ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. वास्तुविशारद यांचेकडून आराखडे अंतिम होताच सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेस्तरावरुन ई-निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

ठाणे मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांकरीता नवीन उपक्रम/योजना राबविण्याबाबत

(२) १४४३ (१८-०३-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे कारागृहातून १७ वर्षांत ८० कैदी पदवीधर परीक्षा उत्तीर्ण झाले असून काही जणांनी गांधी साहित्याचा अभ्यास करुन प्राविण्य मिळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गांधीजींच्या विचार धारेवर आधारीत परीक्षेत ठाणे कारागृहातील निकाल १००% लागला आहे असून ठाणे मध्यवर्ती कारागृहात विविध अभिनव उपक्रम राबवून कैद्यांमध्ये अमुलाग्र बदल करण्याच्या हेतुने करण्यात येणाऱ्या कार्यक्रमामध्ये काही नवीन उपक्रम/योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांकरीता नवीन उपक्रम/योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (१५-०२-२०२१) : (१) ठाणे मध्यवर्ती कारागृहात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठांतर्गत अभ्यास केंद्राव्दारे कारागृहातील बंद्यांसाठी बी.ए. व बी.कॉम. या पदवी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतले जातात. तथापि, ठाणे मध्यवर्ती कारागृहात जास्तीत जास्त न्यायाधीन बंदी असल्यामुळे, पदवी अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत कारागृहातून जामीन, संबंधित केसमधून मुक्त अथवा शिक्षा सुनावल्यामुळे इतर कारागृहात वर्ग होण्याचे बंद्यांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे पदवी अभ्यासक्रमाचे तीन वर्ष पूर्ण करणाऱ्या बंद्यांचे प्रमाण नगण्य आहे.
(२) व (३) ठाणे मध्यवर्ती कारागृहात बंद्यांकरीता गांधी सर्वोदय मंडळ व गांधी बुक सेंटर, मुंबई या संस्थेमार्फत महात्मा गांधींच्या विचार धारेवर आधारित परीक्षांचे आयोजन केले जाते. सदर परीक्षेत बंद्यांचे यशस्वी होण्याचे प्रमाण जवळपास १००% आहे.

ठाणे मध्यवर्ती कारागृहात तेलंगणा राज्यातील कारागृहांच्या धर्तीवर निरक्षर बंद्यांसाठी “विद्यादानम” हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. तसेच सहारा चॅरिटेबल सोसायटी या संस्थेच्या मदतीने “संगणक साक्षरता” हा प्रकल्प सुरु करण्याचे प्रस्तावित असून, निरक्षर बंद्यांकरीता उच्च शिक्षित बंद्यांमार्फत “साक्षरता अभियान” चालविले जाते. बंद्यांना शारिरीक कवायत, योग प्रशिक्षण, कैद्यांच्या मानसिकतेत बदल होण्यासाठी नैतिक मूल्यांवर आधारित व्याख्याने देणे तसेच त्यांच्या विचारसरणीत बदल होण्यासाठी व वेळ सत्कारणी लावण्यासाठी कारागृहात ग्रंथालय व वर्तमानपत्रे उपलब्ध करुन देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग समित्यांमध्ये स्वयंसेवी संस्था व संघटनांच्या प्रतिनिधींची नियुक्ती करण्याबाबत

(३) २१८८ (१८-०३-२०२०) श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग समित्यांमध्ये लोकसहभाग वाढविण्यासाठी स्वयंसेवी संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींची नियुक्ती करण्याची कायदेशीर तरतूद असताना महानगरपालिका निवडणुका होऊन जवळपास ३ वर्षांचा कालावधी उलटूनही सदर नियुक्त्या करण्यात आल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही स्वयंसेवी संस्था व संघटनांनी या नियमाकडे महापालिकेचे लक्ष वेधूनही शासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त नियुक्त्या करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर नियुक्ती न करण्याची कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०१-०२-२०२१) : (१), (२) व (३) मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग समित्यांमध्ये लोकसहभाग वाढविण्यासाठी स्वयंसेवी संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींची नियुक्ती करण्याची कायदेशीर तरतूद असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील १७ प्रभाग समित्यांवर बिनसरकारी संघटना आणि समाजलक्षी संघटना यांच्या प्रतिनिधींचे नामनिर्देशन करण्यासाठी दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी ६ वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पंढरपूर रेल्वे पोलीस स्टेशन स्थापन करण्याबाबत

(४) २९०० (२९-०५-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) रेल्वे स्टेशनवर मोठ्या प्रमाणात चोरीच्या घटना घडत असून प्रवासी/भाविकांना चोरीच्या तक्रारी नोंदविण्याकरीता रेल्वे पोलीस स्टेशन नसल्याकारणाने कुर्डुवाडी येथे चोरीच्या तक्रारींची नोंद करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर रेल्वे स्टेशन परिसरात वाढत्या चोरीच्या प्रमाणावर नियंत्रण मिळविण्याकरीता पंढरपूर रेल्वे स्टेशन येथे नवीन रेल्वे पोलीस स्टेशन स्थापन करणेबाबत प्रवासी/भाविकांनी माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पंढरपूर रेल्वे पोलीस स्टेशन स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (२९-०१-२०२१) : (१), (२) व (३) पंढरपूर रेल्वे स्टेशन येथे रेल्वे पोलीस स्टेशन नाही तथापि, तक्रार आल्यास पंढरपूर रेल्वे स्टेशन येथील दूरक्षेत्रामध्ये जबाब नोंदवून घेण्यात येवून, गुन्हा असल्यास कुर्डुवाडी पोलीस स्टेशन येथे नोंद करण्यात येते. यासाठी प्रवासी/भाविक यांना कुर्डुवाडी पोलीस स्टेशन येथे प्रत्यक्ष जावे लागत नाही.

पंढरपूर येथे वाढती प्रवासी व भक्तांची गर्दी विचारात घेता भविष्यात पंढरपूर रेल्वे स्टेशन येथे स्वतंत्र पोलीस ठाणे स्थापन करण्यास रेल्वे प्रशासनाची संमती आवश्यक आहे. याबाबत रेल्वे प्रशासनाशी पत्रव्यवहार सुरू असून सदर संमतीपत्र प्राप्त होताच पंढरपूर रेल्वे स्टेशन येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन स्थापन करणेबाबत पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला कोरोनाच्या पार्श्वभुमीवर आर्थिक सहाय्य करण्याबाबत

(५) ३२०७ (२८-०५-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांना कोरोनामुळे माहे मार्च, २०२० मध्ये वेतन वर्गवारीनुसार ५० आणि ७५ टक्के देण्यात आले, प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे नियोजन अगोदर केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी आणि विविध भागात अडकलेल्या मजुरांना त्यांच्या मुळगावी पोहोचवण्याच्या हालचाली सुरू असून राज्य शासनाने एसटीला आवश्यक तेवढे आर्थिक बळ देण्याकरीता रुपये एक हजार कोटीचे पॅकेज जाहीर करावे अशी मागणी एसटी कामगार संघटना आणि इतर संघटनांनी केल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोरोनाच्या पार्श्वभुमीवर तोट्यात असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला आर्थिक सहाय्य देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. अनिल परब (२२-०२-२०२१) : (१) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे महामंडळाच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाल्याने निधी अभावी वेतन देण्यास विलंब झाला होता. तथापि, माहे मार्च, २०२० चे वेतन शासनाच्या धोरणाप्रमाणे शासन परिपत्रक, वित्त विभाग, दिनांक ३१/०३/२०२० अन्वये कर्मचाऱ्यांच्या प्रवर्गाप्रमाणे ५०, ७५ व १०० टक्के असे अदा करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत नोव्हेंबर, २०२० पर्यंतचे संपूर्ण वेतन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आलेले आहे.

(२) व (३) शासन निर्णय, दिनांक १४/१२/२०२० अन्वये कर्मचाऱ्यांचे माहे नोव्हेंबर, २०२० ते एप्रिल, २०२१ या कालावधीच्या वेतनासाठी रुपये १०००.०० कोटींचे विशेष अर्थसहाय्य राज्य परिवहन महामंडळासाठी मंजूर करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सारी आजाराच्या रुग्णांबाबत

(६) ३२२५ (०२-०६-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सिव्हिअर एक्यूट रेस्पिरेटरी इलनेस म्हणजेच "सारी" या आजाराची ५५३ जणांना लागण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णांची कोरोना चाचणी केली असता त्यामधील १०४ रुग्णांना कोरोनाची लागण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, विदर्भात "सारी" या रोगाने ५० जणांचा मृत्यू झाला असल्याची बाब दिनांक २८ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने "सारी" रोगाच्या प्रादुर्भावास आळा घालण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (२२-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात दिनांक १५ जुलै, २०२० अखेर ३७५९३ "सारी" या आजाराचे रुग्ण आढळून आले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

३७५९३ सारी रुग्णांपैकी ३४८७४ रुग्णांची कोरोना चाचणी केली असता, १६६८९ रुग्णांना कोरोना आजाराची लागण झाल्याचे आढळून आले.

(३) हे अंशत: खरे आहे.

माहे मे, २०२० अखेर विदर्भात ४६ रुग्णांचा “सारी” या आजाराने मृत्यू झाले आहेत.

(४) “सारी” प्रतिबंध व नियंत्रणासाठी राज्यात पुढील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत व येत आहेत.

१) "सारी" असलेल्या व्यक्तींचे नियमित सर्वेक्षण.

२) "सारी" सर्वेक्षणासाठी शासकीय, खाजगी रुग्णालये आणि प्रयोगशाळा यांचा समन्वय.

३) प्रत्येक सारी रुग्णाची कोरोनासाठी प्रयोगशाळा तपासणी, विलगीकरण व उपचार.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रुग्णालयाच्या गैरकारभारामुळे महिलेची घरीच प्रसुती झाल्याबाबत

(७) ३२३२ (२९-०५-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर ओटी सेक्शन परिसरात राहणाऱ्या रोशनी शेख या गर्भवती महिलेला दिनांक २५ एप्रिल, २०२० रोजी सकाळी प्रसुती वेदना सुरु झाल्यावर टाळेबंदीमुळे कोणतेही वाहन उपलब्ध नव्हते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन किलोमीटर चालत जाऊन कॅम्प तीन परिसरातील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात भरती होण्यासाठी गेल्या असता प्रसुतीची वेळ आली नाही या कारणास्तव त्यांना दोनदा घरी पाठविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याच दिवशी संध्याकाळी श्रीमती रोशनी यांची घरीच प्रसुती करण्याची वेळ आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उल्हासनगरच्या शासकीय रुग्णालयातील कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (१५-०२-२०२१) : (१) श्रीमती रोशनी शेख रिक्षाने रुग्णालयात आल्या होत्या.

(२) हे खरे नाही, गर्भवती महिला स्वेच्छेने आपल्या घरी गेली.

(३) श्रीमती रोशनी बबलू शेख यांची घरीच प्रसुती झाली हे खरे आहे.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात येत असून, चौकशीअंती दोषी आढळल्यास संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

राज्यातील पोलिसांवरील हल्ल्याच्या घटनांबाबत

(८) ३२३७ (३०-०५-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.निलय नाईक : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद, बुलढाणा, भिवंडी, मालेगांव, मुंब्रा, मानखुर्द, डोंगरी इ. परिसरांमध्ये काही विशिष्ट प्रवृत्तीच्या नागरिकांनी कर्तव्यावर असलेल्या पोलिसांवर हल्ले करुन मारहाण केल्याच्या घटना निदर्शनास आले असून कोरोना या वैश्विक संकटाच्या पार्श्वभुमीवर कडक लॉकडाऊन पाळणे आवश्यक असताना, पोलिसांनी कार्यवाही केल्यास, उलटपक्षी त्यांचेवरच मारहाण करण्याच्या १५० पेक्षा जास्त घटना नोंद झाल्याचे माहे एप्रिल-मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समाजकंटकांवर अजामीनपात्र गुन्हे दाखल होण्याची आवश्यकता असताना, हे गुन्हे दाखल होऊ नयेत, असा राजकीय दबाव पोलीस यंत्रणेवर येत असल्याने बऱ्याच ठिकाणी साधे गुन्हेही दाखल झाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अवाजवी राजकीय हस्तक्षेपामुळे पोलीस दलाचे मानसिक खच्चीकरण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोलीस दलाचे मानसिक खच्चीकरण करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन पोलिसांना मारहाण करणाऱ्या समाजकंटकांवर अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (१९-०२-२०२१) : (१) शासनाने कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी लॉकडाऊनच्या काळात केलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करताना कर्तव्यांवर असलेल्या पोलिसांना मारहाण करण्याच्या घटना राज्यात काही ठिकाणी घडलेल्या आहेत.
(२), (३) व (४) पोलिसांना मारहाण करणाऱ्या समाजकंटकांवर तात्काळ गुन्हे दाखल करुन आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आली असून, भा.दं.वि. कलम ३५३, ३३२ सह इतर सर्व आवश्यक त्या कलमांनुसार अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांना केलेल्या मारहाणीच्या अनुषंगाने राज्यात एकूण २६८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राज्यातील पोलिसांवर हल्ले रोखण्यासाठी उपाययोजनाच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ०६/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व पोलीस घटकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मराठा आरक्षण आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत

(९) ३३१३ (३०-०५-२०२०) श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत प्रभाकर पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक २६ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार मराठा आरक्षण आंदोलकांवरील खटले मागे घेण्याच्या अनुषंगाने, अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या

समितीने शिफारस केलेले खटले मा.मंत्रिमंडळ उपसमितीसमोर सादर करण्यात आले असून, एकूण २८८ खटले मागे घेण्याबाबत मा.न्यायालयाची अनुमती मागावी असा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू २८८ खटले मागे घेण्याबाबत मा.न्यायालयाची अनुमती घेऊन खटले मागे घ्यावयाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, तसेच, उर्वरित खटले मागे घेण्याबाबत शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठा आरक्षण आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (१६-०२-२०२१) : (१) होय.

(२) व (३) मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान आंदोलकांवर दाखल एकूण २९१ खटल्यांपैकी १०४ खटले मा.न्यायालयातून मागे घेण्यात आले असून उर्वरित १८७ खटले न्यायालयातून मागे घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

तत्कालीन मंत्रिमंडळ उपसमितीने मराठा आरक्षण आंदोलकांवरील ३५ प्रकरणे प्रलंबित ठेवण्याचा निर्णय घेतला होता. सदर ३५ प्रकरणे शासनाच्या निर्णयार्थ सादर करण्यात येत आहेत. तर १ प्रकरण शासनाने अमान्य केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेबाबत

(१०) ३३४९ (१०-०६-२०२०) श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सदाशिव खोत, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, डॉ.परिणय फुके, श्री.महादेव जानकर, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत प्रमाणीकरणात बँक खाते क्रमांक, आधार व रकमेसंदर्भात जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत तसेच जिल्हास्तरीय समितीकडे ६४७ शेतकऱ्यांच्या आणि सातही तहसिलदारांकडे ३८३ शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या होत्या, त्यापैकी १८९ तक्रारींचे निवारण तहसिलस्तरावर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत सुमारे ३२ लाख शेतकरी पात्र ठरले असून त्यापैकी केवळ ६० टक्के म्हणजेच १९ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात १२ हजार कोटी रुपये आतापर्यंत जमा झाले असले तरी सुमारे ११ लाख १२ हजार शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मु.पो. बेंबळे (ता.माढा, जि.सोलापूर) येथील ३१ शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेले नसतानाही बँक ऑफ महाराष्ट्र (शाखा निमगांव) येथील कर्जमाफीच्या यादीत नाव आले असून या शेतकऱ्यांनी ज्या बँकेकडून कर्ज घेतले होते त्या बँकेच्या कर्जमाफीच्या यादीत त्यांचे नाव आलेले नाही तसेच माढा तालुक्यासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेमध्ये प्रचंड प्रमाणावर गैरव्यवहार झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुमारे ११ लाख १२ हजार शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ विनाविलंब देण्याचेदृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१६-०२-२०२१) : (१) अंशतः खरे आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील जिल्हास्तरीय समितीकडे ६४८ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ६२१ तक्रारींचे निवारण करण्यात आले असून २७ तक्रारी प्रलंबित आहेत.

तसेच सोलापूर जिल्ह्यातील तहसिलस्तरावर ११११ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी १०५१ तक्रारींचे निवारण संबंधित तहसिलदारांव्दारे करण्यात आले असून ६० तक्रारी प्रलंबित आहे.

(२) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत सद्य:स्थितीत सुमारे ३०.८५ लाख कर्जखात्यांवर सुमारे रुपये १९,६८४ कोटीचा लाभ देण्यात आला आहे.

(३) नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील (एसआरए) झोपडीधारकांनी एकांपेक्षा अधिक सदनिका गैरमार्गाने बळकावल्याबाबत

(११) ३६२१ (०३-०६-२०२०) श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील (एसआरए) अनेक झोपडीधारकांनी इमारतीमध्ये एकांपेक्षा अधिक सदनिका गैरमार्गाने मोफत बळकावल्या असूनही दोषींविरोधात कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी श्री.शेख अब्दुल रहिम यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेबाबत दिनांक १७ मार्च, २०२० रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी सर्वेक्षण करून दोषी झोपडीधारकांवर केलेल्या कारवाईचे सविस्तर तपशील दिनांक २७ मार्च, २०२० अखेरपर्यंत सादर करण्याचे निर्देश झोपुप्रा व शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरोधातील कारवाईचा अहवाल सादर करण्यात आला आहे काय, अहवालाचा थोडक्यात गोषवारा काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (०१-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) यासंदर्भात मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१६८५/२०१४ दाखल करण्यात आली होती. सदर प्रकरणी आदेश निर्गमित होण्यापूर्वी २५८१ अनधिकृत झोपडीधारकांची प्रकरणे संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ई अन्वये निष्कासनाची कारवाई करण्याकरीता पाठविली होती. त्यानंतर एकूण ८६,४२९ सदनिकांच्या सर्वेक्षणाचे कामकाज पूर्ण झालेले असून १३,५६४ झोपडीधारकांची प्रकरणे संबंधित सक्षम प्राधिकरण यांच्याकडे निष्कासन कारवाईसाठी पाठविण्यात आलेली आहेत. त्यापैकी २३९ प्रकरणांमध्ये निष्कासनाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. तर २८३९ प्रकरणांमध्ये निष्कासनाचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. आणि १२७० प्रकरणांमध्ये सुनावणी सुरु आहे. तसेच ११० प्रकरणांमध्ये सुनावणी होऊन प्रकरणे निर्णयासाठी प्रलंबित आहेत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील WRIT Petition Urgent २/२०२० मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १५/०७/२०२० रोजी आदेश निर्गमित केले असून ३ई च्या कारवाईस दिनांक ३१/०८/२०२० पर्यंत स्थगिती देण्यात आली होती. त्यानुसार दिनांक ३१/०८/२०२० पर्यंत कोणतेही निष्कासन करता आले नाही. त्यानंतर मा.उच्च न्यायालयाने ३ई च्या कारवाईस दिलेल्या स्थगितीला वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे. यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०९/१२/२०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर स्थगितीस दिनांक ३१/०१/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत ३ई ची कारवाई करणे शक्य होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्ह्यातील कोयना धरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

(१२) ३६५६ (०२-०६-२०२०) श्री.प्रशांत परिचारक : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोयना धरणासाठी ज्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित झाल्या त्या शेतकऱ्यांना मुंबई उच्च न्यायालयाने आदेश देऊनही शेतकऱ्यांना जमिनीचे वाटप माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल केल्याचा राग मनात धरून पुनर्वसन विभाग जाणीवपूर्वक शेतकऱ्यांना त्रास देत आहे असा शेतकऱ्यांचा आरोप असून शेतकरी तीव्र आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार (१५-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.

कोयना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे सातारा, सांगली, सोलापूर, रायगड, रत्नागिरी, ठाणे व पालघर या जिल्ह्यात पुनर्वसन करण्यात आलेले आहे. या सात जिल्ह्यात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना पर्यायी जमिनीचे वाटप गेली ५० वर्षापासून करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यात कोयना प्रकल्पग्रस्तांच्या ३५ गांवे व १२ वाड्या आहेत. सन १९७० पासून रायगड जिल्ह्यातील ४६ गावांमध्ये ११७६ कोयना प्रकल्पग्रस्तांना एकूण ७३४-५०-१५ हे.आर. पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालयात वेळोवेळी दाखल रिट पिटीशन मधील निर्देशाप्रमाणे सुमारे १२ प्रकरणांमध्ये पर्यायी जमीन वाटप करण्यात आली आहे. तर न्यायालयाच्या निर्णयानुसार जमीन वाटपाची १२ प्रकरणे जिल्हा पुनर्वसन अधिकारी सातारा यांचेकडे तपासणीसाठी पाठविली असून ६ प्रकरणे

तहसिलदार स्तरावर प्रकल्पग्रस्तांनी मागणी केलेल्या पर्यायी जमिनीबाबत तपासणी करण्यासाठी प्रलंबित आहेत. याचिकाकर्त्यांनी त्यांच्या अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे सादर केल्यावर ती कागदपत्रे संबंधित तहसिलदार व जिल्हाधिकारी सातारा यांच्या कार्यालयाने पडताळणी करून त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यावर याचिकाकर्त्यांना न्यायालयाच्या निर्णयानुसार जमीन वितरण करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अभियांत्रिकी आणि तंत्रनिकेतन महाविद्यालयातील अध्यापकांचे मानधन प्रलंबित असल्याबाबत

(१३) ३६९० (०२-०६-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९ शासकीय अभियांत्रिकी आणि ४४ शासकीय तंत्रनिकेतने महाविद्यालयातील ३ हजार अतिथी अध्यापकांचे वेतन माहे ऑगस्ट, २०१९ पासून थकित असल्याचे निदर्शनास आले असून सदरहू सर्व अतिथी अध्यापक नेट, सेट, पी.एच.डी. असून मागील अनेक वर्षापासून अध्यापक भरती न झाल्याने त्यांना तुटपुंज्या मानधनावर सेवा द्यावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये अध्यापकांना रुपये ६००/- तास, तर प्रात्यक्षिक वर्गाचे रुपये ३००/- तास असे मानधन दिले जात असून महिन्याला एकूण रुपये आठ ते दहा हजार एवढे तुटपुंजे वेतन अध्यापकांना मिळते, तसेच, टाळेबंदीच्या कालावधीमध्ये महाविद्यालये बंद असल्याने या काळातील मानधन मिळणार नसल्याची चिंता अतिथी अध्यापकांमध्ये निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शासकीय अभियांत्रिकी आणि तंत्रनिकेतने महाविद्यालयामध्ये अध्यापकांची अनेक अतिथी पदे रिक्त असल्याने सदरहू पदांवर अतिथी अध्यापक म्हणून काम करीत असलेल्यांचे कायमस्वरूपी समायोजन करावे अशी मागणीही अध्यापकांनी मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सदरहू अतिथी अध्यापकांना मागील माहे ऑगस्ट, २०१९ पासूनचे थकित वेतन तसेच शासकीय सेवेत कायमस्वरूपी समायोजन करण्याच्या मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत (११-०२-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, दिनांक १७ मार्च, २०१७ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन दुप्पट करण्यात आले असून, याकरीता येणाऱ्या खर्चास अतिरिक्त निधी मंजूर करण्यात येणार नसल्याने येणारा खर्च संस्थेकडील उपलब्ध निधीतून व मंजूर अनुदानातूनच भागविण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सन २०१९-२०२० करीता व्यावसायिक सेवा (२८) या उद्दीष्टाकरीता मागणीपेक्षा कमी तरतूद उपलब्ध झाल्याने रक्कम प्रलंबित आहे.

(२) हे अंशत: हे खरे आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.(१००/१६)/तांशि-१, दिनांक १७ मार्च, २०१७ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधनात सुधारणा करण्यात आलेली असून सदर मानधन दुप्पट करण्यात आले आहे.

त्यानुसार सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार तासिका तत्वावर कार्यरत अध्यापकांना अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरीता घेण्यात आलेल्या तासिकांप्रमाणे मानधन देण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) सन २०१९-२०२० करीता अर्थसंकल्पामध्ये व्यावसायिक सेवा या उद्दीष्टाकरीता मागणीपेक्षा कमी तरतूद उपलब्ध झाल्याने रक्कम प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे हिवरे-पिंपळे (ता.खेड, जि.पुणे) येथील शेतकऱ्यांना चासकमान डावा कालव्यामधुन उपसा करण्यास परवानगी देण्याबाबत

(१४) ३७५० (०२-०६-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हिवरे-पिंपळे (ता.खेड, जि.पुणे) येथे ३०० हे. क्षेत्रात सिंचनासाठी पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्यामुळे पाण्याअभावी पिकांचे नुकसान होत असल्यामुळे येथील क्षेत्रातील पाणी परवानाधारक शेतकऱ्यांना चासकमान डावा कालव्यामधुन उपसा करण्यास परवानगी देण्याबाबत शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ मे, २०२० रोजी निवेदनाव्दारे शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (२९-०१-२०२१) : (१) अंशत: खरे आहे, दिनांक १४/०५/२०२० चे निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, यापूर्वी सन २०१७ मध्ये मौजे हिवरे-पिंपळे येथील एका शेतकऱ्याने चासकमान डावा कालवा कि.मी. ७९ मधून उपसा सिंचन पाणी परवानगीसाठी चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे या विभागाकडे मागणी केली होती.
(२) मौजे हिवरे-पिंपळे, ता.शिरुर या गावातील क्षेत्र चासकमान डावा कालवा कि.मी. ७१ ते ८० या लांबीत कालव्याच्या वरील बाजूस (Uncommand side) येते. शासन निर्णय, क्र.संकीर्ण-१००१/(३७८/२००१)/सिं.व्य.(धो), दिनांक

२१ नोव्हेंबर, २००२ नुसार सदर लांबीत ४१.८२ हे. क्षेत्र उपसा सिंचन परवानगी देणेसाठी अनुज्ञेय आहे. या कालवा लांबीतील अनुज्ञेय क्षेत्र शिल्लक नसल्याने नवीन उपसा सिंचन पाणी परवानगी देता येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील अनेक विभागामध्ये कोरोना काळात अनधिकृत बांधकामात वाढ झाल्याबाबत

(१५) ३८६० (१४-०९-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनेक विभागामध्ये कोरोना काळात अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणात वाढलेली असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी अनधिकृत बांधकामावर महापालिकेने केलेल्या कारवाईनंतर पुन्हा त्याच जागी अनधिकृत बांधकामे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन-तीन मजल्यांच्या अनधिकृत बांधकामामुळे पावसाळ्यात धोका निर्माण झाल्यामुळे याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त अनधिकृत बांधकामे तात्काळ निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०३-०२-२०२१) : (१) दिनांक १ मार्च, २०२० ते जुलै, २०२० या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाच्या एकूण २०४१ तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाल्या आहेत.

त्यापैकी ५५७ अनधिकृत बांधकामांना नोटीसा देऊन, त्यापैकी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन १५९ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.

उर्वरित प्रकरणांमध्ये कायदेशीर कार्यवाही सुरु असून, कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदर अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासन कारवाई केल्यानंतर पुन्हा १०१ ठिकाणी अनधिकृत बांधकामे करण्यात आली असून, त्यापैकी ९५ ठिकाणी महानगरपालिकेमार्फत पुन्हा निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

उर्वरित प्रकरणांमध्ये कायदेशीर कार्यवाही सुरु असून, कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदर अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात येणार आहेत.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पावसाळ्यापूर्वी करण्यात आलेल्या सर्वेक्षणादरम्यान सी-१ प्रवर्गातील (अत्यंत धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारती) एकूण ४४३ इमारती आढळून आल्या आहेत.

सदर धोकादायक इमारतींची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून, त्याबाबत वृत्तपत्रात प्रसिध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अन्वये कारवाई करण्यात येते.

दिनांक ०१/०४/२०१९ ते माहे जुलै, २०२० पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ६१०६ अनधिकृत बांधकामांना नोटीसा देऊन त्यापैकी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन २६४२ अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आली आहेत.

उर्वरित प्रकरणांमध्ये पुढील कायदेशीर कार्यवाही सुरु असून, कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदर अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात येणार आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

राज्यातील बौध्द समाजातील तरुणांना चुकीच्या नमुन्यातील जात प्रमाणपत्र दिल्या जात असल्याबाबत

(१६) ४०९० (१७-०७-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने तयार केलेल्या आणि देशातील सर्व राज्यात लागू असलेल्या नमुन्यातच जातीचे प्रमाण द्यावे असे आदेश असतानाही महाराष्ट्रातील सामाजिक न्याय विभागाकडून येथील बौध्द समाजातील तरुणांना चुकीच्या नमुन्यातील जात प्रमाणपत्र दिले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे केंद्र शासनाच्या माध्यमातून विविध क्षेत्रात मिळत असलेल्या सवलती राज्यातील बौध्द समाजातील तरुणांना मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानपरिषदेत सादर करण्यात आलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी उक्त प्रकरणाची चौकशी करून सदर प्रश्न सोडविण्यासाठी मंत्रालयीन अधिकाऱ्यांसमवेत संबंधित लोकप्रतिनिधीं सोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत प्रशासकीयस्तरावर कुठल्याच प्रकारची कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील बौध्द समाजातील तरुणांना केंद्र शासनाने तयार केलेल्या विहित नमुन्यातच जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.धनंजय मुंडे (१५-०२-२०२१) : (१) ते (५) हे खरे नाही.

सन १९५० च्या केंद्र शासनाच्या आदेशानुसार केवळ हिंदू व शीख धर्मियांना अनुसूचित जातीचे समजले जाते. अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतरीतांना अनुसूचित जातीच्या सवलती महाराष्ट्र शासनाने लागू केल्या होत्या व त्याबाबतचा नमुना सन १९६२ पासून विहित केला आहे.

अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतरीतांना केंद्र शासनाच्या सवलती मिळण्याकरीता केंद्र शासनाने संविधान (अनुसूचित जाती) आदेश (सुधारणा) कायदा, १९९०, दिनांक ३ जून, १९९० अन्वये सुधारणा केली व अनुसूचित जातींची यादी हिंदू, शीख व बौध्द धर्मियांना लागू केली.

राज्य शासन राज्यातील अनुसूचित जातीतील धर्मांतरीत बौध्दांना राज्य शासनाच्या सवलती देत असल्याने राज्याच्या नमुन्यात धर्माचा उल्लेख पूर्वीपासूनच आहे. मात्र, केंद्राच्या नमुन्यात धर्माचा उल्लेख नसून केवळ जातीचा उल्लेख आहे. याबाबत राज्याने विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे सुधारणा करण्याची केंद्राला विनंती करण्यात आली होती. ती अद्यापपर्यंत मान्य झालेली नाही.

या प्रकरणी विधीमंडळात झालेल्या चर्चेच्यादरम्यान सदर प्रश्न सोडविण्यासाठी मंत्रालयीन अधिकाऱ्यांसमवेत संबंधित लोकप्रतिनिधींची बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. तथापि, मार्च, २०२० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन कोविड-१९ या साथीच्या पार्श्वभूमीवर लवकर संपविण्यात आले व त्यानंतर लॉकडाऊनमुळे बैठक होऊ शकलेली नाही. याबाबत, राज्य शासन लवकरच बैठक आयोजित करण्याची तजवीज करीत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दुर्गम आदिवासी पाड्यांवरील विभक्त झालेल्या कुटुंबांना अंत्योदय योजनेच्या लाभासहित नवीन शिधापत्रिका देण्याबाबत

(१७) ४१२० (३१-०७-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आधीच मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या १६ आदिवासी संवेदनशील प्रकल्प विभागामध्ये अन्नधान्य व इतर अत्यावश्यक वस्तू उपलब्धता कमी असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनाबाधित रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना राज्यातील दुर्गम आदिवासी पाड्यांवरील विभक्त झालेल्या कुटुंबांना अंत्योदय योजनेच्या लाभासहित नवीन शिधापत्रिका द्या असे आदेश उच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिले असल्याची बाब माहे मे, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.छगन भुजबळ (०१-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) जनहित याचिका क्र. LD-VC-१४/२०२० च्या अनुषंगाने सुनावणी होऊन दिनांक १५/०५/२०२० रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी शिधापत्रिकासाठी प्राप्त झालेले अर्ज परिस्थिती सामान्य झाल्यावर नियमानुसार निकाली काढण्याबाबत आदेश दिले आहेत. सदर आदेशात दुर्गम आदिवासी पाड्यांवरील विभक्त झालेल्या कुटुंबांना अंत्योदय योजनेच्या लाभासहित नवीन शिधापत्रिका द्या, असे नमूद केलेले नाही.
(३) व (४) संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जांवर नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येत असून त्यांना पात्रतेनुसार अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांची शिधापत्रिका वितरित करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोळंबी प्रकल्पात (जि.पालघर) कोळंबीची चोरी होत असल्याबाबत

(१८) ४१३९ (१५-०७-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील सफाळ्याच्या पश्चिमेला दातिवरे, खर्डी, जलसार टेंभी खोडावे वेढ, विलंगी, डोंगरे त्याचप्रमाणे माहिम व केळवे परिसरातील गावालगत सुमारे पाच हजार एकर क्षेत्र खारटन जमिनी असून या क्षेत्रात जवळपास लहान-मोठे ३५० कोळंबी प्रकल्प असून मात्र या प्रकल्पात कोळंबी उत्पादन घेण्याआधीच लाखो रुपयांच्या कोळंबीची चोरी व लुटीचे प्रकार दिनांक २४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चोरीला गेलेली कोळंबी विरार, वसई व सफाळाच्या मासळी बाजारात घरगुती खाण्यास विक्रीसाठी नेली जात असून यासंदर्भात सफाळे व केळवे पोलिसांकडे अनेकदा तक्रारी करुनही कोणतीही कारवाई होत नसल्याने कोळंबी व्यवसाय सुरु ठेवण्यास प्रकल्प मालक व व्यवस्थापन कर्मचारी हतबल झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (१७-०२-२०२१) : (१) अंशतः खरे आहे.

कोळंबीची चोरी प्रकरणी सन २०१४ ते १७ जुलै, २०२० रोजी पावेतो सफाळा पोलीस ठाणे येथे ४ गुन्हे तर केळवा पोलीस ठाणे येथे ८ गुन्हे असे एकूण १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) कोळंबीची चोरी प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी यांचेविरुध्द सफाळा पोलीस ठाणे येथे ४ गुन्हे तर केळवा पोलीस ठाणे येथे ८ गुन्हे असे एकूण १२ गुन्हे दाखल करण्यात आले असून, सदर १२

गुन्ह्यापैकी एका प्रकरणात मा.न्यायालयाने आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे. २ गुन्हे न्यायालयात प्रलंबित असून एका प्रकरणी मा.न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे. तसेच ८ प्रकरणांचा पोलीस तपास चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महापालिकेच्या धर्तीवर म्हाडालाही प्रिमीअम धोरण लागू करण्याबाबत

(१९) ४१६८ (१४-०९-२०२०) श्री.विलास पोतनीस : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र चेंबर ऑफ हौसिंग इंडस्ट्रीज क्रेडाईने मुंबई महापालिकेच्या धर्तीवर म्हाडालाही प्रिमीअम धोरण लागू करावे अशी मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने आर्थिक अडचणीत असलेल्या विकासकांसाठी म्हाडाने नवे धोरण तयार केले असून ते मंजुरीसाठी गृहनिर्माण विभागाकडे पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धोरणाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तसेच उक्त धोरणाची अंमलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (२२-०१-२०२१) : (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र चेंबर ऑफ हौसिंग इंडस्ट्रीज, क्रेडाईने बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या दिनांक १७/०९/२०१९ च्या परिपत्रकानुसार ५ ते ६ टप्प्यात प्रिमीयम वसुल करण्याचे धोरण लागू करावे, अशी मागणी शासनाकडे केली. या मागणीसंदर्भात एमसीएचआय क्रेडाई यांनी शासनास सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचेकडे दिनांक २१/०१/२०२० रोजी बैठक आयोजित

केली होती. सदरहू बैठकीमध्ये अधिमुल्याची रक्कम २ टप्प्यात म्हणजेच २०% रक्कम म्हाडास भरणा केल्यानंतर म्हाडामार्फत आरंभ प्रमाणपत्र जारी करावे व ८०% टक्के रक्कम विकासकाने भोगवटा प्रमाणपत्र देतांना भरावी, असे धोरण म्हाडाने तयार करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

सदरहू बैठकीमधील निर्देशानुसार, वरीलप्रमाणे धोरण ठरविण्याबाबतचा प्रस्ताव म्हाडाने दिनांक १०/०६/२०२० च्या पत्रान्वये शासनास सादर केला. परंतु, प्रस्तावित २०:८० धोरणाबाबत म्हाडाने पुन्हाआढावा घेतला असता, प्रधानमंत्री आवास योजनेकरीता वितरित होणारा निधी तसेच मुंबई मंडळांतर्गत विविध महत्वाकांक्षी प्रकल्पाकरीता लागणारा निधी व अनुषंगिक बाबींची तपासणी केली असता प्रस्तावित २०:८० धोरण म्हाडाला राबविणे शक्य होत नाही असे, उपाध्यक्ष, प्राधिकरण यांनी त्यांच्या दिनांक २७/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविले आहे.

तद्नंतर यासंदर्भात, मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२/१२/२०२० रोजी झालेल्या बैठकीत अधिमुल्य आकारणी धोरणाबाबत फेरतपासणी करुन सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे म्हाडास निर्देश दिलेले आहेत.

नागपूर येथील टाटा स्टील व सेलचे काम करणाऱ्या माथाडी कामगारांना सम प्रमाणात काम वाटून देण्याबाबत

(२०) ४४०१ (१४-०९-२०२०) श्री.दुष्यंत चतुर्वेदी : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००६ मध्ये आधुनिक मेटॅलिकचे काम प्रथमतः कळमना यार्डात (नागपूर) आले तेव्हा टाटा स्टील व सेलचे काम करणाऱ्या माथाडी टोळ्यांमध्ये काम मिळण्यावरुन वाद निर्माण झाला त्यावेळेस सहाय्यक कामगार आयुक्त व अध्यक्ष, नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असुरक्षित कामगार मंडळ, नागपूर ह्यांनी दिलेल्या निर्णयानुसार टाटा व सेल ह्या कंपनीचे काम वगळता जे काही काम नागपूर जिल्ह्यातील सायडिंगवर येईल ते काम दोन्ही टोळ्या सम प्रमाणात वाटून घेतील असा निर्णय दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.भूषण स्टील ह्या कंपनीचा माल सर्वप्रथम सन २०१० साली कळमना यार्डात आला, त्यावेळी अगोदर ठरल्याप्रमाणे टाटा स्टील व सेल कामगारांच्या टोळ्यांनी हे काम सम प्रमाणात करुन घेतले, मात्र ह्याच कंपनीचा माल जेव्हा कळमेश्वर रेल्वे सायडिंगला आला तेव्हा पुन्हा वाद निर्माण झाल्यामुळे त्यावेळी तत्कालीन अध्यक्षांनी दिनांक ५ जुलै, २०११ रोजी वा त्यासुमारास ७५% काम सेलचे कर्मचारी व २५% काम टाटाचे कर्मचारी करतील असा निर्णय दिला त्यांच्या ह्या निर्णयास विदर्भ माथाडी कामगार संघटना व आणखी काही संघटनांनी विरोध करत मा.कामगार आयुक्तांना या प्रकरणी हस्तक्षेप करण्याबाबत निवेदनाव्दारे मागणी केल्यानंतर मे.भूषण स्टीलचे काम ५०% प्रमाणे वाटून घ्यावे असा निर्णय दिनांक २९ जुलै, २०११ रोजी वा त्यासुमारास दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विदर्भ माथाडी कामगार संघ ह्यांनी टाकलेल्या W.P.क्र. ४९०/२०१३ च्या निर्णयात सुध्दा मे.भूषण स्टीलचे काम टाटा व सेलच्या कामगारांनी शक्य तोवर सम प्रमाणात करावे असे आदेश मा.न्यायालयाने सन २०१७ मध्ये दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतरही ह्या प्रकरणी संबंधितांनी आवश्यक कार्यवाही न केल्याने कामाचे सम प्रमाणात वाटप झालेले नसल्यामुळे टाटाच्या कामगारांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करून मा.न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही केली आहे, तसेच कामगारांना सम प्रमाणात काम मिळण्याच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील (१२-१०-२०२०) : (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही. प्रकरणातील संबंधित माथाडी टोळया तसेच संघटनेसह कोणीही याबाबत मंडळासमोर प्रश्न उपस्थितीत केला नसून अशा प्रकारे कामगारांचे आर्थिक नुकसान होत असल्याची तक्रार मंडळास प्राप्त झालेली नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

बीड नगरपरिषदेंतर्गत येणाऱ्या महापुरुषांच्या पुतळ्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत

(२१) ४४३२ (१४-०९-२०२०) श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपरिषदेंतर्गत येणाऱ्या महापुरुषांच्या पुतळ्यांची देखभाल, दुरुस्ती व स्वच्छताही केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अनेक तक्रारी करून देखील याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कारवाई करुन पुतळ्याची देखभाल करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०९-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.

बीड नगरपरिषदेंतर्गत येणाऱ्या सर्व महापुरुषांचे पुतळे चांगल्या स्थितीत असून महापुरुषांच्या पुतळ्यांची दैनंदिन साफ सफाई करण्याकरीता कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच सर्व महापुरुषांचे पुतळे आठवड्यातून एक वेळेस धुवून घेण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवालात नमूद केले आहे.

(२) अशा स्वरुपाची कोणतीही तक्रार बीड नगरपरिषद कार्यालयास प्राप्त झालेली नसल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सर्वांसाठी घरे योजनेतील सिडकोच्या गृह प्रकल्पाच्या योजनेची चौकशी करण्याबाबत

(२२) ४५०९ (१६-०७-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वांसाठी घरे या उद्दिष्टपूर्तीसाठी सिडकोने ९५००० घरांचा प्रकल्प हाती घेतला असून परिवहन केंद्रित विकास संकल्पनेवर आधारित सिडकोने सदर गृहनिर्माण योजना जाहीर केली असून उक्त योजना चार टप्प्यांमध्ये पूर्ण करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चार टप्प्यासाठी वेगवेगळे कंत्राटदार नेमण्यात आले असून त्यांनी एकाच प्रकारच्या गृहनिर्माण प्रकल्पासाठी वेगवेगळी दर आकारणी केली असून ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर कंत्राटदारांना दोन हजार कोटी रुपयांची उचल दिली गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गृहनिर्माण प्रकल्पाच्या वैधते बद्दल अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून तक्रारींमध्ये वेगवेगळ्या प्रकारे तसेच वेगवेगळ्या पध्दतीने लावलेली किंमत, पैशाची आगाऊ उचल आदी अनेक वादग्रस्त मुद्दयांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (१०-०२-२०२१) : (१) हे खरे आहे.

सिडकोमार्फत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटाकरीता मुख्यत: परिवहन केंद्रित विकास संकल्पनेवर आधारित एकूण ८६९६१ घरांचा प्रकल्प एकूण चार पॅकेज अंतर्गत विकसित करण्यात येणार आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकल्प एकूण चार बांधकाम पॅकेज अंतर्गत विकसित करण्यात येत असून सदर पॅकेजेसकरीता वेगवेगळे कंत्राटदार नेमण्यात आले आहेत. प्रत्येक पॅकेजमधील कामाचे स्वरुपामध्ये परिवहन केंद्रित सुविधेनुसार बदल असल्याने प्रत्येक पॅकेजच्या कामाची प्राप्त निविदा वेगळी होती. चारही पॅकेजच्या दरामध्ये असलेला फरक हा त्या पॅकेजच्या कामाच्या स्वरुपानुसार आहे. सर्व कंत्राटदारांना अंदाजपत्रकीय किंमतीशी तुलना करतांना एकसमान दर पातळी कायम ठेवण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे धनगर टाकळी (ता.पूर्णा, जि.परभणी) येथील चोरीच्या घटनेबाबत

(२३) ४५१८ (०९-०९-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धनगर टाकळी (ता.पूर्णा, जि.परभणी) येथे दिनांक २ मे, २०२० रोजी मध्यरात्री चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम असे लाखो रुपयांचा ऐवज चोरी केल्याची तक्रार श्री.भिमराव लोखंडे यांनी चुडवा पोलीस ठाणे येथे दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलिसांनी श्वानपथक बोटांचे ठसे इत्यादी प्रकारे तपास करुन देखील अद्याप चोरीच्या गुन्ह्याचा तपास लागलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर गुन्ह्याचा तपास करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत व चोरीस गेलेला मुद्देमाल मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (०४-०२-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, चुडवा, जि.परभणी येथे गु.र.नं. ७९/२०२० भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी आरोपीचा शोध घेण्याचा कसोशीने प्रयत्न करण्यात आला असून आरोपी मिळून न आल्याने गुन्हा कायम तपासावर ठेवून मा.न्यायालयात 'अ' वर्ग समरी सादर करण्यात येत आहे.
(४) विलंब झालेला नाही.

पातूर (जि.अकोला) तालुक्यातील बोगस बियाणे उत्पादक कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत

(२४) ४५८० (१५-०७-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातूर (जि.अकोला) तालुक्यातील ३१ गावातील शेतकऱ्यांनी ६५ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन पिकाची पेरणी केले असता बोगस बियाणामुळे सोयाबीनचे पीक उगवले नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले असल्याचे माहे जून, २०२० च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी बोगस बियाणे उत्पादक कंपनीविरुध्द विहित नमुन्यात पातूरच्या पंचायत समितीच्या कृषी विभागात तक्रार दाखल करुन नुकसान भरपाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस बियाणे उत्पादक कंपनीविरुध्द कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दादाजी भुसे (०४-०२-२०२१) : (१) पातूर तालुका (जि.अकोला) मधील शेतकऱ्यांच्या सोयाबीन बियाणांच्या उगवण शक्ती कमी असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) पातूर तालुका (जि.अकोला) येथून सोयाबीन बियाणांच्या उगवण शक्ती कमी असल्याच्या आतापर्यंत एकूण ४२९ शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने तालुका तक्रार निवारण समितीमार्फत पंचनामे करण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. तपासणीअंती ४५ तक्रारींमध्ये

बियाणे सदोष असल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी ११ तक्रारदार शेतकऱ्यांना ६० बॅग (११.०० क्वि.) बियाणे बदलून दिले आहे. सदर बियाण्यांची रक्कम रुपये १.३२ लाख आहे. उर्वरित शेतकऱ्यांना बियाणे कंपन्यांकडून नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राजापूर (जि.रत्नागिरी) येथे सुपर मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याबाबत

(२५) ४६२२ (२२-०७-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यामध्ये राजापूर तालुका हा मुंबई-गोवा महामार्गावर वसलेला असून रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याचे मध्यस्थान आहे, मुंबई-गोवा महामार्गावरील रायगडपासून गोव्यापर्यंत आरोग्यविषयक कोणतीही परिपूर्ण सेवा उपलब्ध नसून दोन्ही जिल्ह्यांमधील जिल्हा रुग्णालयेही परिपूर्ण सेवेत नसल्यामुळे जिल्ह्यातील एखाद्या अत्यावस्थ रुग्णाला उपचारासाठी मुंबई किंवा कोल्हापूरला नेण्याशिवाय कोणताच पर्याय उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-गोवा हा महामार्ग डोंगरदऱ्यांमधून जात असून ८० टक्क्यांपेक्षा जास्त कोकण भागातून जात असल्याने सदर महामार्गावर अपघात झालेल्या रुग्णांना मुंबई किंवा कोल्हापूर येथील रुग्णालयात पोहोचण्यास उशीर लागत असून वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे अनेकदा रुग्णांचा मृत्यू होत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजापूर येथे मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटना तसेच स्थानिकांनी शासनाकडे केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राजापूर येथे मल्टीस्पेशालिटी रुग्णालय त्वरित उभारण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे (१५-०२-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

दोन्ही जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय पूर्णत: कार्यरत आहेत. मात्र एखाद्या अत्यावस्थ रुग्णाला पुढील तातडीच्या उपचारार्थ कोल्हापूर/मुंबई येथे घेवुन जातात.
(२) महामार्गावर अपघात होतात हे खरे आहे, मात्र १०८ ची सुविधा अशा अपघातग्रस्त रुग्णांसाठी उपलब्ध आहेत. १०८ रुग्णवाहिकेव्दारे नजिकच्या रुग्णालयात उपचारासाठी रुग्णांना घेऊन जातात.
(३) हे खरे आहे.
(४) राजापूर पासून जवळपास ११५ कि.मी. अंतरावर सद्य:स्थितीत सावंतवाडी येथे १०० खाटांचे सुपर मल्टीस्पेशालिटी रुग्णालय मंजूर झालेले असून तेथे न्युरोलोजी, ऑन्कॉलॉजी, युरोलॉजी व कार्डीओलॉजी सुविधा उपलब्ध होणार आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अकोट ते तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात चिपी येथे लघु पाटबंधारे बांधण्याबाबत

(२६) ४६६२ (०९-०९-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोट ते तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात ३० किलोमीटरच्या पट्ट्याला सातपुडा पर्वत रांगामधुन वाहणाऱ्या लहान-मोठ्या ५२ नदया नाल्यांची देणगी लाभलेली असणे व त्यानुषंगाने चिपी येथे लघु पाटबंधारा व्हावा अशी मागणी स्थानिक जनतेच्यावतीने लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निवेदनाव्दारे शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाटबंधारासंदर्भात सर्व्हेक्षण व अंदाजपत्रक तयार झालेले असूनही निधी अभावी काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर लघु पाटबंधाऱ्याच्या कामास निधी उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शंकरराव गडाख (१०-०२-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) मौजे चिपी ल.पा. योजनेच्या धरणाची लांबी १५ मी.पेक्षा जास्त असल्यामुळे दिनांक २७/०९/२०१९ च्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता (सांडवा) मध्यवर्ती संकल्पचित्र मंडळ नाशिक यांच्याकडून प्रस्तावित ल.पा. योजनेचे धरण काटच्छेदाचे संकल्पन तयार करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्याकरीता आवश्यक रुपये ९.३० लक्ष इतके शुल्क देखील अदा करण्यात आले आहे. योजनेच्या धरण काटछेदाचे संकल्पन प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

हिंगोली जिल्ह्यात पोलीस विभागाच्या वाहतूक शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक यांचेवर कारवाई करण्याबाबत

(२७) ४७४३ (०९-०९-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात पोलीस विभागाच्या वाहतूक शाखेत कार्यरत असलेल्या सहायक पोलीस निरीक्षक यांनी कोरोना साथीच्या काळात शेतकरी, व्यापारी, पत्रकार आणि सामान्य जनतेच्या गाड्या अडवून त्यांना नाहक त्रास देण्यात येत असल्याच्या निषेधार्थ अनेक तक्रारी दाखल असून त्यांच्या विरोधात आंदोलने देखील झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २९ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास कोरोना साथीच्या काळात संचारबंदीत शिथिल असलेल्या वेळेत जनतेला वाहतूक पोलिसांकडून विनाकारण मारहाण होत असल्याबाबत या घटनेचे वार्तांकन करण्यासाठी गेलेले न्यूज १८ आयबीएन लोकमतच्या पत्रकार कन्हैयालाल खंडेलवाल यांना वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक यांनी व त्यांच्या पथकाने विनाकारण मारहाण करुन कानपटीस बंदूक लावून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सहायक पोलीस निरीक्षक यांनी यापूर्वी कार्यरत असलेल्या ठिकाणीसुध्दा वर्धा येथे पत्रकार व राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांना मारहाण करणे, नांदेड येथे स्थानिक गुन्हे शाखेत असताना खंडणीच्या गुन्ह्यांमध्ये आरोपीने त्यांचे नाव घेणे, तसेच आखाडा बाळापुर (जि.हिंगोली) येथे व्यापारी लोकप्रतिनिधी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन धमक्या देणे इत्यादी प्रकार केल्याच्या तक्रारी दाखल असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकरी वर्ग, व्यापारी, सामान्य जनतेला, लोकप्रतिनिधींना नाहक त्रास देऊन अधिकाराचा गैरवापर करणाऱ्या हिंगोली पोलीस विभागातील वाहतूक शाखेच्या सहायक पोलीस निरीक्षक यांची शासनाकडून सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू पोलीस विभागातील वाहतूक शाखेत कार्यरत असलेल्या सहायक पोलीस निरीक्षक यांना निलंबित करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (०३-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.

तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३/०६/२०२० रोजी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना संचारबंदीच्या काळात पोलिसांकडून वाहनधारकांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये, असे निवेदन दिले आहे.

(२) असे निदर्शनास आले नाही.

श्री.कन्हैयालाल खंडेलवाल यांनी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीत दिनांक २९/०३/२०२० वा त्यासुमारास संचारबंदी शिथिल असलेल्या वेळेत श्री.खंडेलवाल यांना वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक श्री.ओमकांत आनंदराव चिंचोळकर यांनी व त्यांच्या पथकाने मारहाण करुन कानपटीस बंदूक लावुन जिवे मारण्याची धमकी दिल्याचे निष्पन्न झाले नाही.

तथापि, सदर प्रकरणात पत्रकार श्री.खंडेलवाल व त्यांचे सहकारी यांनी वाहतूक शाखेचे स.पो.नि. चिंचोळकर व कर्मचारी यांना मारहाण केल्याने पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गु.र.क्र. १६१/२०२० कलम ३५३, ३३३, ३३२, २७०, १८६, १८८, १८९, २९४, १४३, १४७, १४९ भा.दं.वि., आपत्तीव्यवस्थापन कायदा कलम ५६, व कलम १३५ म.पो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असून सदरचा गुन्हा तपासावर आहे.

(३), (४) व (५) श्री.चिंचोळकर हे पोलीस स्टेशन आखाडा बाळापुर येथे कार्यरत असताना दिनांक १३/१०/२०१८ रोजी अवैध जुगार खेळणाऱ्या इसमांवर छापा मारुन गु.र.नं. ३३०/१८ कलम १२ (अ) प्रमाणे ८ आरोपींताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर आखाडा बाळापुर येथील नागरीक व व्यापारी यांनी दिनांक १४/१०/२०२० रोजी रास्ता रोको आंदोलन करुन स.पो.नि. चिंचोळकर यांची तात्काळ बदली करावी, अन्यथा आखाडा बाळापुर व परीसरात दुर्गादेवी मंडळाचे विसर्जन करणार नाही, अशा मागणीचे निवेदन दिले होते.

श्री.चिंचोळकर हे सहायक पोलीस निरीक्षक म्हणून पोलीस स्टेशन गिरड, जि.वर्धा येथे कार्यरत असताना मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केलेल्या लोकांवर कारवाई करताना अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन मारहाण केल्याच्या व लोकांशी अरेरावीचे वर्तन केल्याच्या कसुरीच्या अनुषंगाने श्री.चिंचोळकर यांना अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांनी अपीलावर रुपये ३०००/- तसेच श्री.चिंचोळकर हे वाहतूक नियंत्रण शाखा, वर्धा येथे नेमणुकीस असताना केलेल्या कसुरीबाबत पोलीस अधीक्षक, वर्धा यांनी रुपये २०००/- दंडाची शिक्षा केली आहे.

पोलीस स्टेशन वजिराबाद नांदेड येथे दाखल गु.र.नं. ४१६/२०१७ मध्ये फिर्यादी यांनी श्री.चिंचोळकर यांच्या नावाचा उल्लेख केला होता. परंतु, सदर गुन्हयाच्या तपासात त्यांचा सहभाग नसल्याचे निष्पन्न झाले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

असनिये-घारपी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) मार्गावर संरक्षण भिंत बांधण्याबाबत

(२८) ४७५० (१९-०८-२०२०) डॉ.परिणय फुके : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) असनिये-घारपी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) या मार्गावर दरवर्षी होणारे भूस्खलन व दरड कोसळणे यासारख्या घटनेमुळे सदर मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली असून उक्त ठिकाणी जिवित व वित्त हानी होण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त मार्गावर संरक्षण भिंत बांधण्यासाठी रुपये ८० लाख मंजूर होऊनही संरक्षण भिंतीचे काम सुरु झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन असनिये-घारपी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) मार्गावर संरक्षण भिंत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (०४-०२-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२) असनिये-घारपी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) या मार्गावर संरक्षण भिंत बांधण्यासाठी रुपये ८० लाख मंजूर झालेले नसून रुपये ८० लाख इतक्या निधीची आवश्यकता आहे.
(३) सद्य:स्थितीत कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सिंधुदुर्ग या कार्यालयीन यंत्रणेव्दारे असनिये-घारपी (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याच्या तात्पुरत्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन मधून रुपये १४.९० लक्ष

मंजूर करण्यात आले असून मातीचा ढिगारा हटविणे, रस्त्याची रुंदी वाढवून काँक्रीटीकरण करणे इ.कामे करण्यात आली आहेत. तसेच माहे ऑगस्ट, २०२० मध्ये दरडी कोसळून वाहतूक बंद झाली होती. सदर दरडीसुध्दा सदर कार्यालयीन यंत्रणेव्दारे हटविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी आश्रमशाळेसाठी थेट लाभ हस्तांतरण योजना सुरू करण्याबाबत

(२९) ४८७० (२३-११-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी आश्रमशाळेसाठी सुरू करण्यात आलेली थेट लाभ हस्तांतरण योजना बंद न करण्याबाबत मा.विरोधी पक्षनेते, विधान परिषद यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राव्दारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गैरव्यवहार रोखण्यासाठी सुरू केलेल्या या योजनेचे स्वरूप बदलण्याचे कारण काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुन्हा डीबीटीव्दारे विद्यार्थ्यांना लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (०९-०२-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) डीबीटी योजना बंद करण्याच्या अनुषंगाने राज्यात आंदोलने झाली असून रोख रक्कम हातात आल्याने त्याचा वापर मुलांकडून आवश्यक बाबींसाठी व सकस आहारासाठी न झाल्याने आरोग्याचे प्रश्न निर्माण झाल्याची बाब मा.विधानसभा सदस्यांनी निदर्शनास आणून दिली असून त्यांनी सदर योजना रद्द करण्याबाबत मागणी केली आहे.

त्यास अनुसरून शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहांतील विद्यार्थ्यांकरीता कार्यरत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) धोरणाचा अभ्यास करण्यासाठी दिनांक १३/०८/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये अभ्यासगटाची स्थापन करण्यात आली आहे. सदर अभ्यासगटास दिनांक १५/१२/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. अभ्यासगटाच्या शिफारशीनुसार पुढील उचित निर्णय घेण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पैठण ते औरंगाबाद राज्य मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३०) ४९०५ (१४-१२-२०२०) श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक २८७८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण ते औरंगाबाद या दोन महत्वाच्या शहरांना तसेच महत्वाच्या औद्योगिक व सांस्कृतिक क्षेत्राला पुरक ठरणाऱ्या राज्य मार्गाचे रुपांतर राष्ट्रीय महामार्गात करुन त्यास एनएच-७५२ ई (NH-७५२ E) हा क्रमांक देवून केंद्र शासनाने सदर रस्ता मध्यम प्राधान्यक्रम (Medium Priority) मध्ये अंतर्भूत केला असून सदर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे कामाची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी केंद्र शासनातर्फे 'भारतमाला' योजनेंतर्गत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत DPR बनविण्याचे काम मे.ईगीस इंडिया मर्या. या सल्लागार कंपनीकडून प्रगतीपथावर असल्यामुळे चौपदरीकरणाच्या कामाला शासनाने मंजूरी दिली म्हणणे संयुक्तिक होणार नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने DPR बनवून उक्त प्रकल्पास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच मंजूरी दिलेल्या कामाचे स्वरुप काय असणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०१-०२-२०२१) : (१) पैठण ते औरंगाबाद एनएच-७५२ ई (NH-७५२ E) चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांच्या अखत्यारीतील आहे.

सदर कामाबाबतच्या DPR मंजुरीनंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.
(२) हे खरे असून DPR मंजुरीनंतर केंद्र शासनातर्फे प्रस्तावित रस्त्याच्या बांधकामाकरीता मंजुरीची पुढील प्रक्रिया करण्यात येते, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.
(३) प्रस्तावित रस्त्याच्या DPR अंतर्गत Feasibility Study Report प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांचेकडे दिनांक ३०/०९/२०२० रोजी मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वैद्यकीय शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

(३१) ४९३५ (१७-११-२०२०) श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत वैद्यकीय महाविद्यालयात माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान अधिष्ठाता, प्राध्यापक व अधिव्याख्याता तसेच रुग्णालयातील डॉक्टर, परिचारीका, वॉर्डबॉय इत्यादींसारखी आवश्यक असणारी एकूण मंजूर पदे किती आहेत, त्यापैकी किती पदे रिक्त आहेत,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोरोनासारख्या भविष्यात उद्भवणाऱ्या आपत्तींना तोंड देण्यासाठी सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (०४-०२-२०२१) : (१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई अखत्यारीत असलेल्या राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये यामधील वर्ग-१ ते वर्ग-४ या संवर्गातील एकूण २६.९५ टक्के पदे रिक्त आहेत.
(२) रिक्त पदे भरण्याबाबत नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

(३२) ५०२४ (२३-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जात पडताळणी प्रमाणपत्र प्रक्रिया वेब पोर्टलच्या माध्यमातून प्रायोगिक तत्त्वावर ऑनलाईन पध्दतीने कार्यरत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जात प्रमाणपत्र पडताळणीचे माहे सप्टेंबर, २०२० पर्यंत ३५ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.धनंजय मुंडे (१५-०२-२०२१) : (१) हे खरे आहे. दिनांक २४ डिसेंबर, २०१२ पासून जात प्रमाणपत्र पडताळणी माहिती प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. तद्नंतर पुढील टप्प्यामध्ये जात वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन प्रक्रिया (डिजीटल स्वाक्षरीने) देणेबाबतची कार्यवाही दिनांक ०१ ऑगस्ट, २०२० पासून सुरु आहे.

(२) माहे ऑक्टोबर, २०२० अखेर एकूण ४०३२६ प्रकरणे कार्यवाहीकरीता प्रलंबित असून त्यापैकी ३२६२२ प्रकरणे विहित तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधीची आहेत. तर तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीची ७७०४ प्रकरणे प्रलंबित आहेत.

(३) शासन तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्यास्तरावरुन ऑनलाईन पध्दतीने बैठकांव्दारे समित्यांच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेवून प्रलंबित प्रकरणे नियमानुसार तातडीने निकाली काढण्याची कार्यवाही करण्याबाबत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना वेळोवेळी सूचित करण्यात आलेले आहे. तसेच प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत निर्देश देखील देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क परतावा प्रलंबित असल्याबाबत

(३३) ५०५७ (१८-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक वर्ष सुरु होऊन तीन महिने झाले तरी शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रवेश घेतलेले विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून शुल्क परतावा न मिळाल्याचे कारण देत विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेत प्रवेश देण्यास शाळांनी नकार दिला, तसेच विद्यार्थ्यांकडून पुस्तके, गणवेश आणि इतर गोष्टींसाठी ५ हजार रुपये वसूल केले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गरीब व गरजू विद्यार्थ्यांना हक्काचे शिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी शासन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.वर्षा गायकवाड (१२-०२-२०२१) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

कोरोना प्रादुर्भावामुळे जरी प्राथमिकचे वर्ग बंद असले तरी Online शिक्षण सुरु आहे. तसेच TV/Radio, Community classes व स्वयंसेवकामार्फत वर्ग सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आयसीटी व आयटी शिक्षकांना पूर्ववत सेवेत घेऊन वेतन सुरू करण्याबाबत

(३४) ५०८० (१८-११-२०२०) श्री.कपिल पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शालेय विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान देवून साक्षर करण्यासाठी सन २००८ मध्ये सुरु केलेल्या आयसीटी योजनेनुसार कंपन्यांशी करार करून त्यांच्यामार्फत सुमारे ८००० शिक्षकांना बुट तत्वावर कंपन्यांच्यावतीने ५ वर्षासाठी नेमणुका देण्यात आल्या होत्या, तसेच, शासनाने माहे डिसेंबर, २०१९ मध्ये करार संपल्याचे कारण देवून ही योजना बंद केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी ऑनलाईन शिक्षणाच्या पार्श्वभूमीवर शाळांमधील आयसीटी लॅब सुरू करून आयसीटी व आयटी शिक्षकांना पूर्ववत सेवेत सामावून घेवून वेतन व न्याय देण्याबाबतची मागणी शिक्षक भारती, विदर्भ आयसीटी संगणक शिक्षक संघटना तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ जुलै, २०१९ व दिनांक २० मार्च, २०२० रोजी शासनास पत्र पाठवून केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१२-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.

ICT instructors हे संबंधित खाजगी कंपनीचे कंत्राटी कर्मचारी आहेत. ५ वर्ष संपल्यानंतर संबंधित शाळेला पुरविण्यात आलेले संगणक निरुपयोगी (Writeoff) होतात. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना त्या शाळेत संगणक शिक्षणाचे काम राहात नाही. त्यामुळे कंत्राटी तत्वावरील ICT प्रशिक्षकांच्या सेवा संबंधित संस्थांनी संपुष्टात आणल्या आहेत.

(२) हे खरे आहे. तथापि, ही केंद्र पुरस्कृत योजना असून ती केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राबवावी लागते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कौटुंबिक वादातील शेतजमिनीची प्रकरणे (जि.परभणी) तहसिल व उपविभागीय अधिकारी स्तरावर प्रलंबित असल्याबाबत

(३५) ५१०८ (१३-१२-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ८५ नुसार कौटुंबिक वादातील शेत जमिनीची ३९८ प्रकरणे परभणी जिल्ह्यातील तहसिल व उपविभागीय अधिकारी स्तरावर प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जुलै, २०१८ च्या शासन आदेशाप्रमाणे सर्व जिल्हाधिकारी व तहसिलदार यांनी विहित मुदतीत सदरील प्रकरणे निकाली न काढता प्रलंबित ठेवल्याने कौटुंबिक वाद निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील सर्व प्रकरणे विहित मुदतीत निकाली काढण्याबाबत तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे काय, तसेच किती मुदतीत सर्व प्रकरणे निकाली काढून शेतकऱ्यांना न्याय देण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (२९-०१-२०२१) : (१), (२), (३) व (४) परभणी जिल्ह्यात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ८५ अन्वये, सर्व तहसिल कार्यालयांकडे डिसेंबर, २०१९ मध्ये एकूण ३९८ प्रकरणे प्रलंबित होती. दरम्यानच्या काळात सद्य:स्थितीत सुरू असलेल्या कोरोना विषाणूच्या महामारीमुळे तहसिल स्तरावर नियोजित कामकाज होऊ शकलेले नाही. तरी देखील प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, प्राप्त माहितीनुसार सद्य:स्थितीत एकूण २०१ प्रकरणे प्रलंबित असून, सदर प्रकरणे तीन महिन्यात निकाली काढण्याचे संकल्पीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या निकाली काढण्याबाबत

(३६) ५२८३ (१८-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या निकाली काढण्याचे आश्वासन मा.शालेय शिक्षण मंत्र्यांनी अनेकदा देऊनही अद्याप पुर्तता न केल्याने गोंदिया जिल्ह्यातील विविध संघटनांनी शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यासाठी शासनास निवेदन दिल्याचे माहे सप्टेंबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांमध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी टप्पा अनुदानावर नियुक्त झालेल्या शिक्षकांवर जुन्या पेन्शनबाबत अन्याय दूर करुन २००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या शिक्षकांनाही जुनीच पेन्शन योजना लागू करावी, अनुदान द्यावे, विनावेतन वाढीव पदावर कार्यरत शिक्षकांना पद मंजूर व वेतन अनुदान वर्षाची आश्वासित प्रगती योजना शिक्षकांना लागू करावी आदी मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या निकाली काढण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (०२-०२-२०२१) : (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय शाळा कृती संघटना, गोंदिया यांनी दिनांक ७/०८/२०२० रोजी गोंदिया जिल्हा शिक्षक भारती मुख्याध्यापक संघटना यांनी दिनांक २०/०९/२०२० रोजी निवेदन दिले आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सदर निवेदनामध्ये, अनुदानासाठी पात्र घोषित शाळांना मंजूर अनुदान निधी वितरणाचा शासन आदेश व शिक्षकांचा पगार खात्यावर जमा करणे, तसेच अघोषित उच्च व माध्यमिक शाळांना अनुदानासह घोषित करणे त्याचप्रमाणे प्रयोगशाळा सहायकाचे पद शालार्थ प्रणालित समाविष्ट करणे, नक्षलग्रस्त प्रोत्साहन भत्ता मूळ वेतनाच्या १५ टक्के मिळणेबाबत या मागण्या केल्या आहेत.
(३) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्या तपासण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

आरटीई प्रतिक्षा यादीत वेगळया नावांचा समावेश केल्याबाबत

(३७) ५२९३ (१३-१२-२०२०) श्री.अंबादास दानवे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथे शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) मोफत प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या टप्प्यात पहिल्या फेरीतील प्रवेश प्रक्रियेत पात्र ठरलेली परंतु मागील ३ महिने शाळांना भेटी न दिलेल्या (नॉट ॲप्रोच) विद्यार्थ्यांचा प्रतिक्षा यादीत समावेश केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१६-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला (जि.अकोला) येथील अतिविशेषोपचार रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(३८) ५३२१ (१७-११-२०२०) डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) येथील अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी शासनाने आवश्यक असलेली पदे मंजूर केलेली असताना फक्त पद भरती अभावी सदर रुग्णालय सुरू करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालय हे कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर रुग्णसेवेसाठी सुरू करावे अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालय सुरू करण्यासाठी तेथे पद भरती करून कोरोना बाधित रुग्णांच्या उपचारासाठी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (०४-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेंतर्गत अकोला येथील अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी प्रथम टप्प्याकरीता २२३ पदे निर्माण करण्यास मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक ०२/१२/२०२० च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.
(२) होय, खरे आहे.

(३) अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये कोविड रुग्णांकरीता ३०० खाटांची व्यवस्था करण्यात आली असून उपलब्ध मनुष्यबळाच्या माध्यमातून रुग्णांवर उपचार करण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर खाजगी दवाखाने सुरू ठेवून आपल्या मर्जीनुसार देयक आकारीत असल्याबाबत

(३९) ५४२२ (१७-११-२०२०) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यात कोरोनाने मृत्यूचे प्रमाण वाढले असून वैद्यकीय महाविद्यालयातील अनेक डॉक्टर खाजगी दवाखाने सुरू ठेवून आपल्या मर्जीनुसार देयक आकारुन गरिबांना फसवत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अशा डॉक्टरांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अमित विलासराव देशमुख (०४-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील पाटबंधारे विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

(४०) ५५७५ (२३-११-२०२०) डॉ.परिणय फुके : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिहोरा (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील चांदपूर जलाशय अंतर्गत पाणी वाटपाची जबाबदारी सांभाळणाऱ्या पाटबंधारे विभागात रिक्त पदांमुळे विकास

कामे प्रलंबित राहत असून पाणी वाटप, नहर व कालव्यांची देखभाल व दुरुस्ती कामेही प्रलंबित राहत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुमसर तालुक्यातील पाटबंधारे विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील (१७-०२-२०२१) : (१) होय, अंशत: खरे आहे.

उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून पाणी वाटप, नहर व कालव्यांची देखभाल व दुरूस्ती इत्यादी कामे पार पाडण्यात येत आहेत.

(२) व (३) असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही, तथापि, सरळसेवेने नियुक्ती देण्यात आलेल्या सहाय्यक अभियंता श्रेणी-२ संवर्गातील एकूण १८ पदे नागपूर विभागासाठी प्रस्तावित करण्यात आली आहेत.

शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २ जून, २०१५ अन्वये सरळसेवा भरतीवर निर्बंध घालण्यात आले असून शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २५ मे, २०१७ अन्वये विभागाचा आकृतिबंध सुधारीत झाल्याशिवाय पद भरती करण्यास देखील निर्बंध आहेत. सद्य:स्थितीत जलसंपदा विभागाचा आकृतिबंध सुधारीत करण्याची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे. त्यानुसार विभागाच्या आकृतिबंधास अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर गट 'क' व गट 'ड' संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करता येईल.

तसेच, शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ अंतर्गत जलसंपदा विभागात सिंचन व्यवस्थापनासाठी तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता या तांत्रिक संवर्गात शिकाऊ उमेदवार भरती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरात हाय कपॅसिटी मास ट्रान्झिट रुट योजना राबविण्याबाबत

(४१) ५५८३ (२०-११-२०२०) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक १६१३ ला दिनांक १८ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्याकरीता पुणे शहरात हाय कॅपॅसिटी मास ट्रान्झिट रुट (एचसीएमटीआर) ही योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे व सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती यंत्रणा असणार आहे तसेच उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी किती निधीची आवश्यकता आहे, सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे व योजनेच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (२८-०१-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत योजनेचे संक्षिप्त स्वरूप खालीलप्रमाणे आहे :-

- या प्रकल्पांतर्गत २४ मी. रूंदीचा आणि एकूण ३६ कि.मी. लांबीचा उन्नत स्वरूपाचा (Elevated) वर्तुळाकार मार्ग शहरातून प्रस्तावित करण्यात आलेला आहे.
- यामध्ये दोन लेन बी.आर.टी. (Bus Rapid Transit) व चार लेन खाजगी वाहने याप्रमाणे नियोजन केलेले आहे.
- सदर उन्नत मार्ग आस्तित्वातील रस्त्यांना रॅम्पव्दारे जोडण्यात येणार आहे.
- या प्रकल्पांतर्गत बोपोडी, पुणे विद्यापीठ चौक, सेनापती बापट रस्ता, पौड फाटा, कर्वे रोड, दत्तवाडी, सारसबाग, स्वारगेट, नेहरू रस्ता, लुल्लानगर, वाणवडी, रामवाडी, मुंढवा वडगांवशेरी, विमाननगर चौक व विश्रांतवाडी या प्रमाणे मार्गिका आहेत.

- या योजनेची अंमलबजावणी पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.
- या योजनेचा प्रकल्पीय एकूण खर्च रुपये ८५७२ कोटी असून त्यापैकी उन्नत मार्गिकेसाठी रुपये ५१९२ कोटी आवश्यक आहेत.
- शासन मान्यतेतील अटींनुसार या प्रकल्पासाठी आवश्यक निधी पुणे महानगरपालिकेने स्वत: उभारावयाचा आहे.
- सदर निधी पुणे महानगरपालिकेकडून वेगवेगळया उपाययोजना करुन त्याचप्रमाणे अर्थसहाय्य घेऊन उभारण्यात येणार असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
- या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया राबविली असता बाजार भावाशी सुसंगत निविदा प्राप्त न झाल्याने सदरची निविदा रद्द करण्यात आलेली आहे.
- सद्य:स्थितीत सदर प्रकल्पाचा फेर आढावा घेऊन विविध बाबींचे पुनर्विलोकन करुन पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

मंडणगड व खेड (जि.रत्नागिरी) येथील शासकीय विश्रामगृहांची पुनर्बांधणी करण्याबाबत

(४२) ५५८७ (१४-१२-२०२०) श्री.रामदास कदम : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ३२५९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड व खेड (जि.रत्नागिरी) येथील शासकीय विश्रामगृह, इमारतीच्या पुनर्बांधणीच्या (बांधकाम करणे) अंदाजपत्रकास मान्यता देऊन निधी उपलब्ध करणेबाबत दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंडणगड व खेड तालुक्यातील शासकीय विश्रामगृहाच्या इमारतीच्या पुनर्बांधणीकरीता निधी उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (०१-०२-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२) खेड विश्रामगृहाचे काम अर्थसंकल्पात समाविष्ट असून सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहे. मंडणगड येथील शासकीय विश्रामगृहांच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीबाबत निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अनुदानावर आलेल्या शाळांना नियमित वेतन मिळण्याबाबत

(४३) ५६३१ (१३-१२-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २००७ नंतर अनुदानावर असलेल्या शाळांना योजनेतर (प्लान) मध्ये असल्याने नियमित वेतन मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शाळांना योजनाबाहय (नॉन प्लान) मध्ये करण्यात येऊन नियमित वेतन मिळावे अशी मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागणीनुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड (१६-०२-२०२१) : (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) बगिर आदविासी उपयोजना क्षेत्रामधील सन २००७ नंतर अनुदानावर आलेल्या शाळा/तुकड्या शासन निर्णय, दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ नुसार योजनाबाह्य (प्लॅन टू नॉन प्लॅन) मध्ये करण्यात आल्या आहेत.
आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील सन २००७ नंतर अनुदानावर आलेल्या शाळा/तुकड्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागाव (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील नागाव-पाल्हे खाडीवर नवीन पूल बांधण्याबाबत

(४४) ५६४६ (१४-११-२०२०) श्री.जयंत प्रभाकर पाटील : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागाव (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील नागाव-पाल्हे खाडी पूल नादूरूस्त झाला असून केव्हाही पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुरवस्था झालेल्या पूलावरून अवजड व इतर वाहनांची वाहतूक नियमित होत असल्याने अपघात होवून जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पूलाचे नव्याने बांधकाम करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन नागाव ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामस्थ यांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नागाव-पाल्हे खाडीवर नवीन पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अशोकराव चव्हाण (१५-०२-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

या पुलाच्या स्ट्रक्चरल ऑडीट अहवालानूसार पुलाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत जिल्हाधिकारी, रायगड यांच्या दिनांक ०४/११/२०२० च्या अधिसूचनेनुसार या पुलावरून होणारी अवजड वाहतूक बंद करण्यात आली आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

प्रश्नांकित पूलाच्या पुनर्बांधणीकरीता सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात समाविष्ठ करण्यात आली असून, त्याकामासाठी तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

प्रसिध्द कवी सायमन मार्टीन तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मार्कुस डाबरे यांना नोटीसा पाठविल्याबाबत

(४५) ४६५८४ (१०-०७-२०१९) श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रसिध्द कवी सायमन मार्टीन तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मार्कुस डाबरे यांना लोकसभा निवडणूक, २०१९ च्या आचारसंहितेच्या काळात वसई पोलीस ठाण्याने कलम १४९ च्या नोटीसा पाठविल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक कार्यकर्ते व कवींना पाठविलेल्या या अवमानकारक नोटीसामुळे परिसरातील शांतता धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (०४-०२-२०२१) : (१) वसई पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या श्री.सायमन मार्टीन हे हरित वसई संरक्षण समितीत सक्रीय कार्यकारी सभासद म्हणून काम पाहत असून मार्कुस डाबरे हे हरित वसई संरक्षण समितीत अध्यक्ष म्हणून काम पाहतात. त्यांना लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने कोणताही अनुचित प्रकार होवू नये म्हणून सी.आर.पी.सी. १४९ प्रमाणे नोटीस बजावणी केली होती.

(२), (३) व (४) लोकसभा निवडणूक, २०१९ च्या अनुषंगाने कोणत्याही विशिष्ट पक्षाचे अथवा विचारधारेच्या कार्येकर्त्यांनाच नोटीसांची बजावणी केलेली नव्हती, तर सर्वच पक्षांच्या ठराविक कार्यकर्त्यांना लोकसभा निवडणूक सुरळीत व शांततेत पार पाडाव्यात या सद्हेतुने नोटीसा बजावल्या होत्या. जाणूनबुजून अथवा आकसाने अथवा कोणाची बदनामी करण्याच्या हेतुने नोटीसा दिलेल्या नाहीत.

राज्यात दारिद्रय निर्मुलन करण्याबाबत

(४६) ४६९९४ (०५-०७-२०१९) श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात महाराष्ट्र प्रगत राज्य असूनही देशातील १० टक्के गरीब हे महाराष्ट्रातील असल्याचे दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात एक सामाजिक कार्यकर्त्याने १४ जिल्ह्यातील १२५ गावांना भेटी देऊन पहाणी अहवाल तयार केला असून तो अहवाल शासनाने राज्यातील दारिद्रय निर्मुलन या अहवालाचा आधार घेऊन समकालीन प्रकाशित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात दारिद्रय निर्मुलन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (१७-०२-२०२१) : (१) व (२) हे खरे नाही. असा कोणताही अहवाल या विभागास प्राप्त नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, दारिद्र्य निर्मुलनासाठी ग्रामविकास विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत.

बेस्टला आर्थिक मदत करण्यासाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्याबाबत

(४७) ४७२०६ (१२-०७-२०१९) श्री.अमरिशभाई पटेल, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या बेस्ट उपक्रमाला सुमारे ३ हजार कोटी रुपयांची संचित तूट असल्याचे दिनांक ३ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी वाढणारे इंधनाचे दर, सुटया भागांच्या वाढणाऱ्या किंमती, कर्मचाऱ्यांचे वेतन यामुळे बेस्ट उपक्रमाला उत्पन्न व खर्चाचा मेळ बसविणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार बेस्ट उपक्रमाला आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (१५-०२-२०२१) : (१) दिनांक ३१/०३/२०१९ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षात बेस्ट उपक्रमाला रुपये २१२१.७९ कोटी इतक्या रकमेची संचित तूट होती.

(२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बेस्ट उपक्रमास खालीलप्रमाणे आर्थिक सहाय्य करण्यात आले/येत आहे :-

- सन २०१४-२०१५ मध्ये अनुदान स्वरुपात रुपये १५० कोटी, सन २०१५-२०१६ मध्ये उपक्रमामधील कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याकरीता रुपये २५ कोटी, सन २०१६-२०१७ मध्ये भांडवली स्वरुपाचा खर्च भागविण्यासाठी रुपये १०० कोटी, सन २०१७-२०१८ मध्ये रुपये १३.६९ कोटी आणि सन २०१८-२०१९ मध्ये रुपये १४.५६ कोटी इतके आर्थिक सहाय्य करण्यात आले आहे.

- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्पामध्ये विविध योजना/प्रकल्पाच्या अनुषंगाने बेस्ट उपक्रमास अधिदान करण्याच्या दृष्टीने रुपये १३९.२० कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.
- बेस्ट उपक्रमास आर्थिकदृष्टीने उर्जितावस्थेत आणण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्प "अ" मध्ये रुपये ६०० कोटी, अल्प मुदतीच्या कर्जाची परतफेड त्वरित करण्यासाठी रुपये ११३६.३१ कोटी व दरमहा रुपये १०० कोटी याप्रमाणे रुपये ४०० कोटी अशाप्रकारे बेस्ट उपक्रमास एकूण रुपये २१३६.३१ कोटी एवढे आर्थिक अनुदानाचे अधिदान करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील एमसीव्हीसीच्या शिक्षकांचे वेतन १ तारखेला अदा करणेबाबत

(४८) ४७४५० (०६-०७-२०१९) श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.किशोर दराडे : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येत असलेल्या सर्व प्राथमिक पासून उच्च माध्यमिक पर्यंतच्या एमसीव्हीसीच्या शिक्षकांचे वेतन १ तारखेला अदा करणेबाबत शासनाने आदेश निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांच्या वेतनासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद शासनाने अगोदरच केलेली असूनही वेतन १ तारखेला न झाल्याने शिक्षक संघटनानी व लोकप्रतिनिधीकडून शासनास निवेदन सादर केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार एमसीव्हीसी शिक्षकांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.नवाब मलिक (१०-०२-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मा.मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांच्या अध्यक्षतेखाली कॉन्फरन्स हॉल रविभवन, नागपूर येथे गुरुवार दिनांक १२/०७/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये शिक्षकांचे वेतन १ तारखेला अदा करणेबाबत संचालनालयाने कार्यवाही करावी असे निर्देश मा.मंत्री महोदयांनी दिले होते.

त्यानुंषगाने संचालनालयाचे पत्र क्र.५/व्हीओसी/२२०३/वेतन/२०१८/२७९, दिनांक १५/१०/२०१८ अन्वये सर्व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयांना त्यांच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन १ तारखेला नियमितपणे अदा करण्यात यावे असे निर्देश देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

दिवा (जि.ठाणे) येथे स्वस्तात घरे देण्याचे अमिष दाखवून नागरीकांची फसवणूक केल्याबाबत

(४९) ४९३२७ (२३-०८-२०१९) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिवा (जि.ठाणे) येथे दिवा प्रमाण समिती सह.आयुक्त यांच्या संगनमताने श्री कृपा होम्सच्या नावाने चाळी बांधून स्वस्तात घरे देण्याचे अमिष दाखवून नागरीकांची फसवणूक करण्यात येत असल्याचे माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (०४-०२-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेतील वित्त विभाग समितीचे सहाय्यक आयुक्त गैरव्यवहार करीत असल्याबाबत

(५०) ४९३३० (२३-०८-२०१९) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेतील वित्त विभाग समितीचे सहाय्यक आयुक्त (अतिरिक्त पदभार) गैरव्यवहार करीत असल्याचे तक्रार करण्यात आली असून तक्रार करणाऱ्या व्यक्तीच्या घरी माणसे पाठवून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वर्तकनगर पोलीस ठाणे येथे दिनांक १३ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीची दखल घेवून शासनाने दोषी अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अनिल देशमुख (०४-०२-२०२१) : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

श्री.राजेन्द्र भागवत
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.